# नियमित दिवाणी दावा क्र.१०२/२०१७ मधील नि.६४ खालील आदेश

( वसंत भिकाजी सुतार उर्फ चांदोरकर विरुध्द प्रतिभा प्रकाश पवार वगैरे ३ )

CNR No. MHRT060000541201 7

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६, नियम १७ प्रमाणे प्रतिदावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा प्रतिदावा प्रतिवादीने वादी यांचेविरुध्द प्रतिदाव्यातील मिळकत म्हणजेच गट क्रमांक ४८ (जुना सर्व्हे नंबर ४९/३) ही प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे मालकी वहीवाटीची आहे असा ठराव होउन मिळणेकरीता व निरंतर ताकिदीकरीता दाखल केला आहे. सदर दावा चालू असताना वादीने दावा मिळकतीपैकी ५ गुंठे क्षेत्र प्रतिवादी क्र.४ याला खरेदीखत करुन दिलेले आहे. त्याअनुषंगाने प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी प्रतिदाव्यामध्ये दुरुस्ती केली आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ३ व ४ यांच्यामध्ये आपापसात तडजोड झालेली आहे व त्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ४ यांनी प्रतिदाव्यातील मिळकतीपैकी खरेदी केलेल्या पाच गुंठे क्षेत्राचा बाजारभावाप्रमाणे होणारा मोबदला प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना दिलेला आहे. त्यामुळे सदर प्रतिवादी यांचे प्रतिवादी क्र. ४ यांचेविरुध्द कोणतीही तक्रार राहीलेली नाही. त्यामुळे खरेदीखताच्या अनुषंगाने प्रतिदाव्यात दुरुस्ती केलेला मजकूर वगळून प्रस्तुत अर्जात नमूद केलेली दुरुस्ती करणेकरीता परवानगी करीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन प्रतिवादी यांनी कायद्यातील तरतूदींच्या विरुध्द प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे असे कथन करुन तो खर्चासह नामंजूर करणेची विनंती केलेली आहे.

४. अर्ज व अभिलेख पाहिला. विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५. सदरचा प्रतिदावा प्रतिवादींनी वादीविरुध्द ठरावाकरीता व निरंतर ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे वादींनी दावा प्रलंबित असताना प्रतिदावा मिळकतीपैकी ५ गुंठे क्षेत्र प्रतिवादी क्र. ४ ला विक्री केले. त्याअनुषंगाने प्रतिवादींनी प्रतिदाव्यामध्ये दुरुस्ती केली. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ ते ३ व ४ यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली. त्याअनुषंगाने प्रतिवादींनी प्रतिदाव्यामध्ये दुरुस्ती करणेकरीता परवानगी मागितलेली आहे. सदरची दुरुस्ती ही प्रतिदावा प्रलंबित असताना घडलेल्या बदलाच्या अनुषंगाने असल्याने दुरुस्ती करण्यास परवानगी देणे क्रमप्राप्त होते. प्रस्तुत दुरुस्तीमुळे प्रतिदाव्याचे स्वरुप बदलत नाही. प्रतिदावा दुरुस्ती अर्ज मंजुर केल्यास

वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. प्रतिवादी यांनी प्रतिदाव्यामध्ये वारंवार दुरुस्ती केल्यामुळे वादी यांना ज्या मानसिक त्रासास सामोरे जावे लागले आहे त्याबाबत प्रतिवादी यांनी वादीस नुकसानभरपाई देणे आवश्यक आहे. सबब, वरील सर्व विवेचनाचा विचार करता अर्ज मंजुर करणेच्या निष्कर्षाप्रत मी आले आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## **आदेश**

१. प्रस्तुतचा निशाणी ६४ चा अर्ज रक्कम रुपये ३००/– खर्चासह मंजुर करण्यात येत आहे. सदर खर्चाची रक्कम प्रतिवादी यांनी वादी यांना देणेची आहे.

२. प्रतिवादींनी दुरुस्ती अर्जाप्रमाणे प्रतिदाव्यामध्ये कायद्यानुसार देय मुदतीमध्ये दुरुस्ती करावयाची आहे व प्रतिदावा दुरुस्ती प्रत न्यायालयात दाखल करावयाची आहे.

सही/–

दापोली. (श्रीम. टी.एस. महाडिक)

दि.२५/०१/२०२४. दिवाणी न्यायाधीश,कनिष्ठ स्तर दापोली.

I affirm that the contents of the P. D. F. file order are same, word to word as per original Order.

| | |
|---|---|
| Court Name : | Smt. Tejaswini Sandeep Mahadik<br>Judicial Magistrate First Class,<br>Dapoli Dist. Ratnagiri. |
| Name of Steno : | R.K.Sangare |
| Date of order : | 25/01/2024 |
| Order signed by Presiding Officer on : | 25/01/2024 |
| Order uploaded on : | 25/01/2024 |